# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### रत्नागिरी जिल्ह्यातील एमआयडीसी क्षेत्रामध्ये एकाच व्यक्तींना अनेक प्लॉट एमआयडीसीकडून देण्यात आल्याबाबत

**(१) ६१६४ (०९-०४-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील एमआयडीसी क्षेत्रामध्ये एकाच व्यक्तींना अनेक प्लॉट एमआयडीसीकडून देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमआयडीसीतील जागांचा असा गैरव्यवहार होत आहे अशी तक्रार एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मा.उद्योग मंत्री यांच्याकडे दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने यासंदर्भात चौकशी केली आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०३-१०-२०१७) :** (१) हे खरे नाही.

तथापि औद्योगिक क्षेत्रामध्ये अगोदर उद्योग करीत असलेल्या उद्योजकाकडून महामंडळास मूळ उद्योगाच्या विस्तारासाठी अतिरिक्त जागा / भूखंड यांची मागणी प्राप्त होते. अशा उद्योजकाला देखील भूखंड वाटप समितीकडून भूखंड वाटपाचा निर्णय घेतला जातो. त्यामुळे एकाच उद्योजकाला दुसऱ्या भूखंडाचे वाटप केले जाते. तसेच महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रामध्ये एका व्यक्तीला किती औद्योगिक / व्यापारी भूखंड वाटप करावे, याबाबत नियमामध्ये कोणतीही तरतूद नाही अथवा बंधन नाही.

(२) व (३) अशा प्रकारची कोणतीही तक्रार प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**फुपनगरी (जि.जळगाव) येथील शेतकऱ्यांनी मागणी करुनही विद्युत जोडणी न मिळाल्याबाबत**

**(२) २७२७४ (१०-०८-२०१५). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फुपनगरी (जि.जळगाव) येथील एका शेतकऱ्यांनी शेतात वीज जोडणी मिळण्याकरीता एक वर्षापासून ११ हजार रुपयांची डिमांड नोट भरूनही जोडणी न देता त्याला तब्बल दोन वेळा ५ हजार ७९० रुपयांचे देयक पाठविल्याप्रकरणी स्थानिक पोलिस स्थानकात दिनांक २२ एप्रिल, २०१५ रोजीवा त्यासुमारास तक्रार दाखल केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी आतापर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-१०-२०१७) :** (१) व (२) हे खरे आहे.

सदरची घटना जळगाव जिल्ह्याकरिता नियुक्त केलेल्या क्रॉम्प्टन ग्रीव्हज लिमिटेड या वीज वितरण फ्रॅन्चायझीच्या कार्यकाळातील असून संबंधित शेतकऱ्यांस वीजजोडणी न देताच दोन वेगवेगळी बिले पाठविण्यात आली होती. दि.१२.०८.२०१५ पासून जळगांव विभाग पुन्हा महावितरण कंपनीच्या ताब्यात आला असून सदर ग्राहकास वीजपुरवठा देण्यासाठी १०० के.व्ही.ए. चे रोहित्र महावितरण कंपनीमार्फत बसविण्यात आले आहे व वीज जोडणी न देता आकारण्यात आलेली चुकीची बिले रद्द करण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात उपसा जलसिंचन योजने अंतर्गत कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना कर्ज सवलत देण्याबाबतचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(३) २८१६१ (३१-१०-२०१५). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उपसा जलसिंचन योजने अंतर्गत कर्ज घेतलेले शेतकरी कर्ज परतफेड करण्यास असमर्थ असल्याने सदर कर्ज परतफेडीसाठी सन २००९ मध्ये सवलत देण्याचा शासनाने निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असलयास, उक्त, सवलत योजनेपोटी विदर्भ प्रदेशातील वित्तीय संस्थांनी ४८ कोटी रुपयांचा एकवेळ समझोता (OTS) प्रस्ताव शासनास सादर केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कर्ज सवलत देण्याचा प्रस्ताव शासनाकडे निर्णयाचे प्रतिक्षेत असल्याची कोणती कारणे आहेत,

(४) तसेच, सदर प्रस्तावाचे अनुषंगाने शासन कोणते निर्णय घेणार आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (०५-१०-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) विदर्भ व मराठवाड्यातील उपसा जलसिंचन संस्थांच्या प्रत्येकी रु.२० लाखापर्यंत कर्जमाफीबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, अमरावती यांचेवर कलम ८८ अंतर्गत दिलेला स्थगन आदेश तात्काळ रद्द करण्याबाबत**

**(४) २८८८५ (२२-१२-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, अमरावती यांचेवर कलम ८८ अंतर्गत दिनांक ५ मे, २०१० रोजी माजी सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी स्थगन आदेश दिल्याने आरोप सिद्ध झालेली मंडळी बँकेत कार्यरत असल्यामुळे गैरव्यवहारास खतपाणी मिळून भागधारक आणि खातेधारकांचे अपरिमित नुकसान होत असून हा स्थगनादेश रद्द करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, अचलपूर यांनी दिनांक २१ ऑगस्ट, २०१५ रोजी शासनाकडे पत्र लिहून मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन हा स्थगन आदेश किती कालावधीत रद्द करणार आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०५-१०-२०१७) :** (१) हे खरे नाही. अशा आशयाचे दि.२१ ऑगस्ट, २०१५ रोजीचे निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही.

(२) व (३) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, अमरावती यांचेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ८८ अंतर्गत दि.५/५/२०१० रोजी माजी सहकार मंत्री यांनी दिलेल्या स्थगिती अर्जाच्या प्रकरणावर सुनावणी होऊन दि.१८/४/२०१५ रोजी अंतिम आदेश पारित करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील विजेच्या खांबांची झालेली दुरवस्था**

**(५) ४१०३७ (२०-०४-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण कंपनीमार्फत साखरे, अलोंडा, विक्रमगड व कुर्झे अशा विविध भागात विजेचे खांब बऱ्याच वर्षापूर्वी उभे केले असल्याने सदर खांबांना गंज येवून ते तुटण्याचा स्थितीत आढळून आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खांबावर लोंबकळत असलेल्या विद्युत वाहिन्यामुळे संभाव्य धोका निर्माण झाल्यामुळे त्याबाबत महावितरण कंपनी कोणती उपाययोजना करणार आहे,

(३) तालुक्यात अनेक ठिकाणी रोहित्रे व विद्युत खांबाना मोठ्या प्रमाणात झाडे-वेलीचा विळखा पडल्याने वीज वितरणात अडथळा निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत कंपनी कोणती उपाययोजना करीत आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-१०-२०१७) :** (१) विक्रमगड तालुक्यातील (जि.पालघर) साखरे, अलोंडा, कुर्झे, विक्रमगड तसेच अनेक गावांमध्ये सर्व्हेक्षण केले असता लघुदाब वाहिनीचे ४२६ व उच्चदाब वाहिनीचे २३५ वीजेचे खांब नादुरुस्त असल्याचे आढळून आले.

(२) या परिसरातील वीजेचे गंजलेले धोकादायक एकूण १९८ खांब तसेच ७६ नादुरुस्त डी.पी. बॉक्स बदलण्यात आले आहेत. हे खांब बदलत असताना त्यावरील लोंबकळणाऱ्या तारा सुस्थितीत करण्यात आलेल्या आहेत. सध्या धोकादायक व अपघातजन्य खांब अग्रक्रमाने बदलण्यात आलेले आहेत. उर्वरित कामे O & M, U & M, आणि DDUGJY या योजनांमध्ये प्रस्तावित केलेली आहेत.

(३) होय.

(४) दर शुक्रवारी वाहिन्यांची नियमित देखभाल करण्याचे आदेश स्थानिक महावितरण कार्यालयास देण्यात आले आहेत. देखभाल-दुरुस्तीच्या कामामध्ये वाहिन्यांना स्पर्श करणारी झाडे छाटणे तसेच वेली काढण्याची कामे देखील केली जातात.

---

**राज्यात रमाई घरकुल योजनेमध्ये घरकुलासाठी स्वत:च्या जागेची अट असल्याने अनेक लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ घेत येत नसल्याबाबत**

**(६) ५६०१४ (२०-०८-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रमाई घरकुल योजनेमध्ये घरकुलासाठी लाभार्थ्यांची स्वतःची जागा असावी अशी अट असल्याने अनेकांकडे स्वतःची जागा नसल्यामुळे अनेक लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वतःची जागा घेण्यासाठी लाभार्थ्यांना रुपये ५० हजार अर्थसहाय्य शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात येते, परंतु एवढ्या कमी अर्थसहाय्यामध्ये लाभार्थ्यांना जमीन खरेदी करणे शक्य होत नसल्याने संबंधित शहरातील जमिनीच्या मुल्यांकनानुसार रक्कम वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१२-१०-२०१७) :** (१) होय.

(२) ग्राम विकास विभागाकडून ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील लाभधारकांसाठी “पंडित दीनदयाल उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना” राबविण्यात येत असून, या योजनेअंतर्गत जागा खरेदीसाठी देण्यात येणाऱ्या रु.५०,०००/- पर्यंतच्या अर्थसहाय्यामध्ये वाढ करण्याची बाब विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे माणी (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील शेती व बागायती जमिनीमध्ये विद्युत वितरण कंपनीच्या विद्युत खांबांवरील तारा तुटून झालेले नुकसान

**(७) ६४७५८ (१८-०८-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे माणी (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील गट नं. ४३०, ४९८, ६९४ व ५०५ मधील शेती व बागायती जमिनीमध्ये दिनांक १ एप्रिल, २०११ रोजी वा त्यासुमारास महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या विद्युत खाबांवरील तारा तुटून पडल्याने शेतकऱ्यांचे लाखो रुपयाचे नुकसान होवूनही अद्यापही शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्या निर्देशानुसार उपविभागीय अधिकारी (प्रांत) खेड यांचेकडून नुकसान भरपाईबाबत आवश्यक असणारे मुल्यांकन माहे जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास महावितरण कंपनीकडे प्राप्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने महावितरण कंपनीकडून शेतकऱ्यांचे झालेल्या बागायती जमिनीच्या नुकसानाची भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-१०-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाई मुल्यांकनासाठी दि. २२/०८/२०१६ रोजी उपविभागीय अधिकारी खेड यांनी तालुका कृषि अधिकारी व महावितरणचे प्रतिनिधी यांच्यासोबत संयुक्त सुनावणी घेतली. उपविभागीय अधिकारी खेड यांनी कृषी विभागास “शासनाने ठरवून दिलेल्या मापदंडानुसार हेक्टरी अनुज्ञेय अनुदानाची गणना करावी व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MREGS) अंतर्गत मापदंडानुसार जळीत फळझाडांचे मुल्यांकन करुन अहवाल सादर करावा” असे आदेश दिले आहेत.

(४) कृषी विभागाकडून जळीत फळझाडांचे मूल्यांकन अहवाल प्राप्त झाल्यावर महावितरण कंपनीकडून नुकसान भरपाई देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वसई-विरार शहरातील उघड्यावर धोकादायक अवस्थेत असलेली रोहित्रे सुरक्षा कवच लावून सुरक्षीत ठेवण्याबाबत

**(८) ६४८०१ (१८-०८-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहरपरिसरात अनेक ठिकाणी उघड्यावर धोकादायक अवस्थेत असलेली रोहित्रे सेफ्टीबॉक्स लावून सुरक्षित ठेवण्याची मागणी एका सविस्तर लेखी निवेदनाद्वारे दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.उर्जामंत्री महोदयांकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-१०-२०१७) :** (१), (२) व (३) वसई मंडळाअंतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिका परिसरात अनेक ठिकाणी धोकादायक अवस्थेत असलेले एकून १८५ ट्रान्सफॉर्मर (रोहित्र) ला महावितरण कंपनीतर्फे सुरक्षा कवच बसविण्यात आलेली आहेत व उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव शहरातील मार्केट परिसरात मध्यस्थ हातावर रुमाल टाकून बोली लावत असल्याची निदर्शनास आलेली बाब**

**(९) ६७०८० (१६-१२-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाकडून भाजीपाला व फळे नियमनमुक्त झाल्यानंतर शेतकऱ्यांना त्यांचा शेतीमाल बाजार समितीबाहेर अन्यत्र कुठेही विकण्याची मुभा मिळालेली असतांना, जळगाव शहरातील मार्केट परिसरात मध्यस्थ हातावर रुमाल टाकून बोली लावत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१२-१०-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) जळगाव कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात हातावर रुमाल टाकून कोणतीही बोली बोलली जात नाही वा तशी कोणतीही लेखी वा तोंडी तक्रार बाजार समिती तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगाव या कार्यालयाकडे प्राप्त नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समितीअंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत कायमस्वरुपी सामावून घेणेबाबत

**(१०) ६९६६९ (१६-१२-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सेवेत असलेल्या सचिवांना शासकीय सेवेत सामावून घेण्याची मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघाने मा.मुख्यमंत्री हिंगोली येथे दिनांक ७ व ८ ऑक्टोबर, २०१६ रोजी दौऱ्यावर असताना केली होती, हे खरे आहे काय,

(२) तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती, ता.भिवंडी, जि.ठाणे अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत कायमस्वरुपी सामावून घेणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी-भिवंडी पूर्व यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत कायमस्वरुपी सामावून घेणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू प्रकरणाबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (१२-१०-२०१७) :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर बाब धोरणात्मक असल्याने शासन स्तरावर प्रस्तावाची तपासणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### म्हसवड (जि.सातारा) येथील असंख्य वीज ग्राहकांना चुकीची व जादा रक्कमेची आलेली वीजबिले दुरुस्त करुन देण्याबाबत

**(११) ७०७३६ (०७-०१-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हसवड (जि.सातारा) येथील असंख्य वीज ग्राहकांना चुकीची व जादा रक्कमेची आलेली वीजबिले त्वरीत दुरुस्त करुन घेण्याबाबत वीज वितरण कंपनीत ग्राहकांची गर्दी झाली असून वीज वितरण कंपनीविरोधात वीज ग्राहकांनी आंदोलन करण्याचा इशारा दिल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती वीज वितरण कंपनीतील चुकीची बिले पाठवून ग्राहकांना वेठीस धरणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१२-१०-२०१७) :** (१) संबंधित वीजग्राहकांनी आंदोलन करण्याचा इशारा दिलेला नव्हता. परंतु वीज बिलाबाबत त्यांच्या तक्रारी महावितरण कंपनीच्या स्थानिक कार्यालयास प्राप्त झाल्या होत्या.सदर मिटर रिडींग एजन्सीने चुकीची रिडिंग घेतल्यामुळे ६६ वीज ग्राहकांना चुकीची बिले दिली गेल्याचे निदर्शनास आले होते.

(२) व (३) या प्रकरणी महावितरणमार्फत चौकशी करण्यात आली व सदर ग्राहकांची वीज बिले दुरुस्त करुन देण्यात आली तसेच प्रस्तुत मिटर रिडींग एजन्सीवर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली असून सदर एजन्सीकडून रु. २,८७५/- एवढा दंड वसूल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गुहागर (जि.रत्नागिरी) येथे भूमिगत विदयुत तारा टाकण्याबाबत दिलेले आश्वासन**

**(१२) ७३८३० (२८-०४-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय वादळ भय उपशमन योजनेंतर्गत रत्नागिरी जिल्हयातील सागरी किनारपट्टीवर असलेल्या गुहागर शहरातील विदयुत तारा भूमिगत करण्याचे काम प्राधान्याने करण्यात येईल असे आश्वासन मा.ऊर्जा मंत्री यांनी माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाच्या प्रस्तावास मान्यता मिळाली आहे काय,

(३) असल्यास, त्यासाठी किती निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्प (NCRMP) या योजनेअंतर्गत महाराष्ट्राच्या समुद्र किनारपट्टीलगतच्या चार जिल्हयांतील एकूण १२ ठिकाणे सदर कामासाठी प्रस्तावित करण्यात आली होती. त्यामध्ये गुहागर शहराचा समावेश होता. या योजनेअंतर्गत उपरी तारमार्ग भूमिगत करण्याच्या कामासाठी केंद्र शासनाने एकुण रु. २०० कोटीचा निधी मंजूर केलेला आहे. निधीची मर्यादा लक्षात घेता जागतिक बँकेने प्रस्तावित १२ ठिकाणांपैकी रत्नागिरी (जि. रत्नागिरी), अलिबाग (जि. रायगड) व सातपाटी (जि. पालघर) या ठिकाणांची निवड केलेली आहे.

सदर योजनेअंतर्गत गुहागर शहरातील एकूण रु. ७५.२८ कोटीच्या प्रस्तावित कामासाठी अतिरिक्त निधी मंजूर करण्याकरिता महावितरण कंपनीकडून प्राप्त झालेला प्रस्ताव महसूल व वन विभागामार्फत त्यांच्या दि. २५.०४.२०१६ च्या पत्राद्वारे राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, भारत सरकार यांच्याकडे मंजूरीसठी पाठविण्यात आला होता. परंतु राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, भारत सरकार यांनी त्यांच्या दिनांक १६.०५.२०१६ च्या पत्राद्वारे असे कळविले आहे की, प्रथम मंजूर असलेल्या तीन ठिकाणांसाठी

(रत्नागिरी, अलिबाग व सातपाटी) निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मंजूर निधीपैकी काही निधी शिल्लक राहिल्यास गुहागर शहराच्या प्रस्तावासंदर्भात विचार करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आर्थिक संकटात सापडलेल्या राज्यातील सहकारी सुत गिरण्यांना उर्जितावस्थेत आणण्यासाठी उपसमिती नेमण्याबाबत**

**(१३) ७४१२४ (२१-०४-२०१७). श्री.अजय चौधरी (शिवडी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्थिक संकटात सापडलेल्या राज्यातील सहकारी सुत गिरण्यांना उर्जितावस्थेत आणण्यासाठी वित्तीय संस्थांकडून काढलेल्या कर्जावरील व्याज पाच वर्षे राज्य शासन भरणार असल्याबाबत राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय घेतल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुतगिरण्यांना वित्तीय संस्था कर्ज देण्यास तयार नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे शासनावर किती कोटी रुपयांचा बोजा पडणार आहे व वस्त्रोद्योगाला वीजदरात युनिटमागे किती रुपयांची सवलत देण्यात येणार आहे,
(४) असल्यास, शासनाने नेमलेल्या उपसमितीने किती कालावधीत याबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सुचना दिल्या आहेत व त्यानुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (१०-१०-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. याबाबत सूतगिरण्यांमार्फत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) व (४) सूतगिरण्यांनी प्रति चाती रु.३०००/- याप्रमाणे वित्तीय संस्थेकडून ५ वर्षाकरिता कर्ज घेतल्यास किमान १२% नुसार अंदाजे रु.५२.७१ कोटी इतका बोजा प्रतिवर्षी शासनावर पडणार आहे.

सहकारी सूतगिरण्यांना वीजदरात सवलत देण्याबाबत दि.९.३.२०१७ च्या शासन निर्णयान्वये मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली असून सदर समितीस अहवाल सादर करण्यास दि.२६.७.२०१७ च्या शासन निर्णयानुसार ऑक्टोबर, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर समितीची बैठक दि.१५.३.२०१७ रोजी आयोजित करण्यात आली होती.

---

**उभंड, पिंपरखेड व नांद्रे (जि.धुळे) या गावात वन्य प्राणी येत असल्याने फिडरचा सप्लाय सिंगल फेज २४ तास चालू करण्याबाबत**

**(१४) ७४७१८ (२८-०४-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उभंड, पिंपरखेड व नांद्रे (जि.धुळे) ही गावे जंगल पायथ्याशी येत असल्याने सदर गावात रात्री-अपरात्री वन्यप्राणी येत असल्याने ग्रामस्थांमध्ये घबराटीचे वातावरण असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावातील ग्रामस्थांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि. कंपनी शहर/ग्रामीण, धुळे यांना दिनांक २९ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र देऊन नांद्रे येथील फिडरचा सप्लाय सिंगल फेज २४ तास चालू करण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मागणीवर शासनाने निर्णय घेऊन सदर गावांत २४ तास सिंगल फेज चालू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१२-१०-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) दिनांक २९.११.२०१६ रोजी मा.लोकप्रतिनिधींनी महावितरण कंपनीच्या धुळे (ग्रामीण) शाखेस लेखी पत्र देऊन नांद्रे फिडरचा सप्लाय सिंगल फेज २४ तास चालू करण्याबाबत मागणी केलेली आहे.

(३) उभंड, पिंपरखेड व नांद्रे (जि.धुळे) या गावांना साप्ताहिक चक्राकार पध्दतीने दिवसा ८ तास व रात्री १० तास थ्री फेज व उर्वरित वेळेत सिंगल फेज मिळून २४ तास वीज पुरवठा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यात नाफेड मार्फत सुरु असलेली उडदाची खरेदी बंद केल्याने शेतकऱ्यांचे झालेले नुकसान**

**(१५) ७५३८९ (०६-०५-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती, तालुका सहकारी खरेदी-विक्री संस्था आणि शासन यांच्या सहभागाने हमीभावासह बोनस देवून नाफेड मार्फत सुरु असलेली उडदाची खरेदी दिनांक ६ जानेवारी, २०१७ पासून अचानक बंद करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाफेडने खरेदी बंद केल्याने बाजारभाव ५०० ते ७०० रुपये क्विंटलने घटल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, शेतकऱ्यांचे नुकसान रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१६-१०-२०१७) :** (१) केंद्रशासनाच्या किंमत स्थिरता निधी योजनेंतर्गत नाफेडच्या वतीने राज्यात पणन महासंघ व विदर्भ पणन महासंघाकडून खुल्या बाजारभावाने उडीदाची खरेदी सुरु करण्यात आलेली होती. त्यामुळे नाफेडने दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील उडीदाची खरेदी बंद केल्यामुळे दिनांक ६/१/२०१७पासून उडीदाची खरेदी केंद्रे बंद करण्यात आली आहेत.
(२) हंगाम २०१६-१७ मध्ये केंद्रशासनाने उडीदासाठी रुपये ५०००/- किमान आधारभूत किंमत जाहिर केलेली होती. तथापि, किंमत स्थिरता निधी योजनेंतर्गत खुल्या बाजारभावाने खरेदी केलेली आहे. त्यामुळे केंद्र बंद झाल्यानंतर बाजारभाव कमी झालेले नाहीत.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य सहकारी बँकेचे ६०० कोटी रुपयांचे कर्ज थकविलेले ११ सहकारी साखर कारखाने बँकेने विक्रीस काढल्याबाबत**

**(१६) ७५९४३ (२१-०४-२०१७). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य सहकारी बँकेचे ६०० कोटी रुपयांचे कर्ज थकविलेले ११ सहकारी साखर कारखाने बँकेने विक्रीस काढले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सहकारी साखर कारखान्यांची नावे काय आहेत, व कारखान्यांच्या मालमत्ता विक्रीतून राज्य सहकारी बँकेचे किती कोटी रुपयांचे कर्ज वसूल होणार आहे,
(३) असल्यास, बँकेने विक्रीस काढलेले सहकारी साखर कारखाने,कारखान्याच्या पदाधिकाऱ्यांना खरेदी करण्यास शासनाने बंदी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर साखर कारखान्यांच्या विक्रीबाबतच्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-१०-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर सहकारी साखर कारखान्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | सहकारी साखर कारखान्याचे नाव |
|---|---|
| १ | श्री.गजानन स.सा.का.लि., संभाजीनगर, जि.बीड |
| २ | जिजामाता स.सा.का.लि., दुसरबीड ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा |

| | |
|---|---|
| ३ | विनायक स.सा.का. लि., परसोडा, ता.वैजापूर, जि.औरंगाबाद |
| ४ | देवगिरी स.सा.का., गिरीजानगर, ता.फुलंब्री, जि.औरंगाबाद |
| ५ | पांझराकान स.सा.का.लि., भाडणे, ता.साक्री, जि.धुळे |
| ६ | स.म.स्व.बापूरावजी देशमुख स.सा.का.लि., वेळा, ता.हिंगणघाट, जि.वर्धा |
| ७ | प.डॉ.वि.वि.पाटील स.सा.का.लि., अशोकनगर, ता.केज, जि.बीड |
| ८ | यशवंत स.सा.का.लि., चिंतामणीनगर, थेऊर, ता.हवेली, जि.पुणे |
| ९ | नगर तालुका स.सा.का.लि., वाळकी, मु.पो.देऊळगांव सिध्दी, ता.जि.अहमदनगर |
| १० | जयजवान जयकिसान स.सा.का.लि., नळेगांव, ता.चाकोर, जि.लातूर |
| ११ | श्री.संतनाथ स.सा.का.लि., तुळशीदासनगर, ता.वैराग, जि.सोलापूर |

सदर कारखान्यांच्या मालमत्तेच्या विक्रीतून राखीव किंमतीनुसार सुमारे रु.४६४.४५ कोटी इतक्या रकमेचे कर्ज वसूल होईल.

(३) नाही.

(४) सदर ११ कारखान्यांच्या विक्री प्रक्रियेस प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे कारखाने भाडेतत्वावर चालविण्यास देण्याचा बँकेचा प्रयत्न आहे.

---

**हिमायतनगर (जि.नांदेड) येथील रोहित्र दुरुस्तीच्या कामासाठी वाहतूक करण्याकरिता नेमण्यात आलेल्या ट्रक जाणीवपूर्वक भोकर येथे हलविण्यात आल्याबाबत**

**(१७) ७६२३१ (२८-०४-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिमायतनगर (जि.नांदेड) येथील वीज वितरण कंपनीच्या उपविभागीय कार्यालयातंर्गत हिमायतनगर तालुक्यासह इस्लापूर, अप्पारावपेठ भागात विदयुत रोहित्र दुरुस्तीच्या कामासाठी वाहतूक करण्याकरिता नेमण्यात आलेल्या ट्रकचे चालक, क्लिनर भोकर येथेच वास्तव्याला असल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिमायतनगर येथे सन २००५ मध्ये वीज वितरण कंपनीचे उपविभागीय कार्यालय सुरु झाले असुन त्या अंतर्गत ३० ते ४० किमी अंतर्गत गावे येत असुन या भागातील रोहित्र नादुरुस्त झाल्यास त्याची वीज वितरण कंपनीच्या ट्रकची नितांत आवश्यकता असते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग २ लक्षात घेता असे असुनही भोकर अंतर्गत किनवट, माहूर, हदगांव, भोकर, हिमायतनगर, उमरी हे सहा उपविभागीय कार्यालय असंताना हिमायतनगर उपविभागीय कार्यालयाचा ट्रक जाणीवपूर्वक भोकर येथे हलविण्यात आल्याने वीज ग्राहकांसह शेतकऱ्यांना रोहित्र आणण्यासाठी आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे, हे लक्षात घेता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१२-१०-२०१७) :** (१), (२) व (३) भोकर विभागांतर्गत एकूण ६ उपविभाग आहेत. हया ६ उपविभागांकरिता रोहित्रांची व सामानाची ने-आण करण्यासाठी कंपनीचा सध्या एकच ट्रक उपलब्ध आहे. तसेच भोकर हे ठिकाण मध्यवर्ती व सोयीचे असल्यामुळे हा ट्रक भोकर येथे ठेवण्यात आला आहे व या ट्रकचे वाहक, चालक व क्लिनर हे भोकर येथे वास्तव्यास आहेत. महावितरण कंपनीतर्फे नादुरुस्त रोहित्रांची वाहतूक या ट्रकद्वारे केली जाते. तसेच भोकर विभागीय कार्यालयाकडून अन्य उपविभागातून रोहित्र ने-आण करण्याकरिता दोन वाहने भाडेतत्वावर सुरु आहेत. त्यामुळे वीज ग्राहक/शेतकऱ्यांना रोहित्र आणण्यासाठी कोणताही आर्थिक भुर्दंड लागत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आंबेगाव (जि.पुणे) येथील निरगुडसर आसपासच्या वाड्या-वस्त्यांवर विद्युत देयके वितरणासाठी कोणतीही व्यवस्था नसल्याबाबत**

**(१८) ७६९०२ (२८-०४-२०१७). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंबेगांव (जि.पुणे) येथील निरगुडसर आणि परिसरातील मेंगडेवाडी, जवळे, भराडी, बेलसरवाडी तसेच आसपासच्या वाड्या-वस्त्यांवर विद्युत देयके वितरणासाठी महावितरण विभागाकडून कोणतीही व्यवस्था नसल्याने परिसरातील गावांमध्ये एखाद्या पानपट्टीवर वा एखाद्या दुकानात विद्युत देयके दिली जातात यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०९ जानेवारी, २०१७ रोजी मा.उर्जा मंत्र्यांकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे नागरीकांना आपली विद्युत देयके त्याठिकाणाहून शोधून आणावी लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वेळप्रसंगी विद्युत देयके वेळेवर न मिळाल्यामुळे नागरीकांना मुदत संपून गेल्यामुळे दंडासह विद्युत देयके भरावी लागत आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत तक्रार करुनही कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१२-१०-२०१७) :** (१), (२), (३) व (४) याबाबतचे निवेदन महावितरणच्या पुणे परिमंडळातील मंचर विभागीय कार्यालयास प्राप्त झाले आहे. निरगुडसर शाखा कार्यालयातील त्या त्या गावांध्ये काम करणाऱ्या तांत्रिक कर्मचाऱ्यांद्वारे वीज ग्राहकांना वीज बिले वाटली जातात. तसेच निवेदनातील सूचनेनुसार सर्व कर्मचाऱ्यांना ग्राहकांना विद्युत देयके वेळेवर व संबंधित ग्राहकांच्या घरी देण्याबाबत महावितरण कंपनीने सूचना दिली आहे.

वीज बिल वेळेवर मिळालेले नाही अशी तक्रार ज्या ग्राहकांकडून प्राप्त झाली अशा ग्राहकांना वीज बिलाची दुसरी प्रत मोफत दिली जाते. निरगुडसर व परिसरातील जवळपास ९०% वीज ग्राहकांचे मोबाईल क्रमांक घेऊन त्याची नोंदणी केलेली आहे. त्यामुळे त्या ग्राहकांना

वीज बिल तयार झाल्यानंतर त्यांच्या वीज बिलाची माहिती मोबाईलवर दिली जाते. त्यामध्ये त्यांचे वीज बिल किती आहे व कोणत्या तारखेपर्यंत भरावयाचे आहे हे नमूद केलेले असते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आंबेगाव-शिरुर (जि.पुणे) भागातील तुटलेले फ्यूज बदलून सुरक्षा कवच बसविण्याबाबत**

**(१९) ७७८३८ (२८-०४-२०१७). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंबेगाव-शिरुर (जि.पुणे) या भागातील जारकरवाडी, पिंपळगाव, निरगुडसर, खडकी, लोणी-धामणी, गंगापूर बुद्रुक, मलठण, टाकळीहाजी, रांजणगाव या परिसरातील विद्युत रोहित्रांच्या फ्यूजपेटया उघडया असून त्यातूनच वीजपुरवठा केला जात असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तुटलेले फ्यूज त्वरित बदलून फ्यूजपेटीला सुरक्षा कवच बसविण्यात यावे अशी मागणी या परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी यासंदर्भात दिनांक १९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.उर्जा मंत्र्याकडे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१७) :** (१) या परिसरात काही विद्युत रोहित्रांच्या फ्यूजपेट्या उघडया आढळल्या. त्यांच्या दुरुस्तीबाबत योग्य ती कार्यवाही महावितरण कंपनीकडून वेळोवेळी करण्यात आलेली आहे.
(२) यासंदर्भात दिनांक १९.०१.२०१७ रोजी मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. ऊर्जा मंत्री यांचेकडे दिलेले निवेदन महावितरणच्या केडगाव विभागीय कार्यालयास व पुणे परिमंडळ कार्यालयास प्राप्त झाले आहे.
(३) पुणे परिमंडळाअंतर्गत मंचर विभागामध्ये जारकरवाडी, पिंपळगांव, निरगुडसर, खडकी, लोणी-धामणी, गंगापूर (बु.) ही गावे येतात. तसेच बारामती परिमंडळाअंतर्गत केडगाव विभागामध्ये मलठण, टाकळीहाजी, रांजणगांव ही गावे येतात. या गावातील एकूण वितरण रोहित्र पेट्यांची संख्या-६७३, सुस्थितीमध्ये असलेली रोहित्र पेट्यांची संख्या-४४९, सन २०१६-१७ मध्ये दुरुस्ती केलेली वितरण रोहित्रया पेटयांची संख्या-१०१ व दुरुस्ती सुरु असलेली वितरण रोहित्र पेटयांची संख्या-१२३ इतकी आहे.

तुटलेले फ्यूज बदलणे, रोहित्र वितरण (फ्यूज) पेटीचे दुरुस्ती व देखभाल करणे, आणि विद्युत वाहिन्यांची देखभाल व दुरुस्ती करणे ही कामे महावितरणमार्फत वेळोवेळी केली जातात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यात जात पडताळणीस होणाऱ्या विलंबामुळे रमाई आवास योजनेस अत्यल्प प्रतिसाद मिळत असलेबाबत

**(२०) ७८२५५ (२१-०४-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुसूचित जातीतील कुटुंबाना हक्काचे घर मिळावे या उदात्य हेतूने शासनाने रमाई आवास योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यात जात पडताळणीस होणाऱ्या विलंबामुळे रमाई आवास योजनेंतर्गत २३०० घरांचे उद्दिष्ट असताना केवळ १२०० अर्ज आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जात पडताळणीस होणाऱ्या विलंबामुळे अनेक लाभार्थी या योजनेपासून वंचित राहत असून त्यांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने कोल्हापूर जिल्ह्यात रमाई आवास योजनेस प्रतिसाद मिळण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१०-१०-२०१७) :** (१) होय.

(२) नाही.

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात कोल्हापूर जिल्ह्यासाठी २३७३ इतके उद्दिष्ट दिलेले होते. त्यानुसार मार्च,२०१७ अखेर २३७३ इतक्या घरकुलांना मंजुरी देण्यात आलेली आहे.

(३) नाही.

या योजनेचा लाभ घेण्यानुषंगाने अनुसूचित जातीचा दाखला आवश्यक असल्याने जात पडताळणी दाखला अनिवार्य नाही.

(४) शासन निकषाप्रमाणे रमाई घरकुल योजनेचा लाभ देण्यासाठी गाव पातळीवर प्रचार प्रसिध्दी करुन ग्रामसभेव्दारे पात्र असलेल्या लाभार्थ्यांची निवड करुन पुढील कार्यवाही केली जात आहे. तसेच लाभार्थ्यांना जातीचे दाखले वेळेवर प्राप्त व्हावेत यादृष्टीने तालुकास्तरीय मेळावे घेणेबाबत संबंधितांना कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे उंद्री (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथे वीज उपकेंद्रची असलेली मागणी

**(२१) ७९९७७ (२८-०४-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमडापूर (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील शेतकऱ्यांना पूर्ण क्षमतेने विज पुरवठा होण्यासाठी सध्याच्या विज केंद्रावरील भार कमी व्हावा यासाठी उंद्री येथे विज उपकेंद्राची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबीत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीवर शासनाने निर्णय घेवून उंद्री येथे उपकेंद्र उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१२-१०-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) बुलडाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यातील अमडापूर येथील शेतकऱ्यांना पूर्ण क्षमतेने वीज पुरवठा व्हावा व सध्याच्या वीज उपकेंद्रावरील भार कमी व्हावा यासाठी दिनदयाल उपाध्याय ग्राम ज्योती योजनेअंतर्गत मौजे उंद्री, ता. चिखली, जि. बुलडाणा येथे ३३/११ के.व्ही. नवीन उपकेंद्र मंजूर झालेले असून सदर कामाचा कार्यादेश देण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दौंड, (जि.पुणे) येथील ग्राहकांना अस्पष्ट व अवाजवी विद्युत देयके मिळाल्यामुळे झालेली गैरसोय

**(२२) ८०००१ (२८-०४-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड (जि.पुणे) येथील अनेक ग्राहकांना अस्पष्ट, अवाजवी वीजबिले मिळाल्यामुळे महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून मोघम वसुली केली जात असल्यामुळे अनेक ग्राहकांची गैरसोय झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही ठिकाणी वीजबिले वेळेत मिळत नाहीत तर काही ठिकाणी वीजबिले असप्ष्ट मिळाली आहेत त्यामुळे ग्राहकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्राहकांची झालेली गैरसोय दूर करण्यासाठी शासनाकडून काय कार्यवाही केली जात आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१२-१०-२०१७) :** (१) व (२) जानेवारी, २०१७ च्या सुमारास वीज बिले अस्पष्ट आल्याच्या तक्रारी सदर तालुक्यातील महावितरणच्या उपविभागीय कार्यालयास प्राप्त झाल्या. अशा ग्राहकांनी ताबडतोब बिलाची दुसरी प्रत विनामूल्य देण्यात आली आहे.
(३) ग्राहकाला वीजबिले अस्पष्ट वा वेळेत न मिळाल्याची तक्रार प्राप्त झाल्यास संबंधित ग्राहकास ताबडतोब बिलाची प्रत विनामूल्य देण्यात येते. ग्राहकांना त्याच्या बिलाचा भरणा महावितरण कंपनीच्या संकेत स्थळावरुन व मोबाईल ॲपद्वारे भरण्याची सोय उपलब्ध आहे. तसेच महावितरणकडून ग्राहकांना त्यांच्या बिलाची माहिती एस.एम.एस द्वारे दिली जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यात सन २०१३-१४ पासून अनेक विद्यार्थ्यांनी बनावट जात वैधता प्रमाणपत्राचा वापर करुन नोकरी, उच्चशिक्षण व पदोन्नती मिळविल्याबाबत**

**(२३) ८०३५२ (२१-०४-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात सन २०१३-१४ पासून अनेक विद्यार्थ्यांनी बनावट जात वैधता प्रमाणपत्रांचा वापर करून नोकरी, उच्च शिक्षण व पदोन्नती मिळविल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान उपसंचालक व उपायुक्त कार्यालयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (११-१०-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या दि.२०/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील सर्व विभागीय कार्यालयांना त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व शासकीय व शासकीय अनुदानित, विद्यापीठ संचलित तसेच खाजगी विना अनुदानित संस्थेतील राखीव प्रवर्गात प्रवेशित विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र इ. प्रमाणपत्रे निर्गमित करणाऱ्या संबंधित प्राधिकरणाकडे पाठवून त्याबाबतची सत्यता पडताळणी करणेबाबत कळविले होते. त्यानुसार सात विद्यार्थ्यांनी बनावट जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याचे आढळून आले आहे.

(३) त्यासंबंधी ज्या महाविद्यालयात सदर विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे अशा महाविद्यालयांना सदर विद्यार्थ्यांच्या विरोधात फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

तसेच भद्रकाली पोलीस ठाणे, नाशिक येथे बनावट जात प्रमाणपत्र पडताळणीचा दाखला बनवणारे ललित मुकुंदराज शिरसाठ व सचिन गोरख देवरे यांचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील यंत्रमागधारकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत**

**(२४) ८०९८९ (२८-०४-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात यंत्रमाग व्यवसायाला प्रती युनिट १ रुपया ६६ पैसे दराने वीज मिळावी, कर्ज व्याजात ५ टक्के सबसिडी मिळावी, यंत्रमागधारकांची मजुरी पक्की करावी, सूत दर १५ दिवस स्थिर ठेवावा, सुतावर एमआरपी छापावी आदी मागण्यांसाठी “मी स्वाभिमानी कारखानदार” संघटनेच्यावतीने बाळा महाराज व अमोद मेहतर यांनी बेमुदत उपोषण चालू केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यंत्रमागधारकांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत शासन स्तरावर कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त निर्णयाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१६-१०-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) साध्या यंत्रमाग धारकांनी घेतलेल्या कर्जाचे व्याज ५ टक्के प्रमाणे राज्य शासनाने ५ वर्षासाठी देण्याबाबतचा व २७ अश्वशक्ती व त्यापेक्षा कमी जोड भार असणाऱ्या साध्या यंत्रमाग धारकांना दि.१ जुलै, २०१६ पासून प्रतियुनिट रु.१-/ इतकी सवलत वीजदरात देण्याबाबतचे प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहेत.
(३) वरील प्रस्तावांवर अद्यापपर्यंत अंतिम निर्णय झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वीज वितरण व्यवस्थेच्या पायाभूत विकासासाठी चार हजार कोटी रुपये खर्चाची योजना राबविण्याबाबत

**(२५) ८१३३६ (२८-०४-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वीज वितरण व्यवस्थेच्या पायाभूत विकासासाठी चार हजार कोटी रुपये खर्चाची योजना राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेचे स्वरुप काय आहे, याबाबत निर्णय घेण्यात आला असल्यास निर्णयाचे स्वरुप काय आहे व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा येत आहे,
(३) अद्याप, निर्णय घेण्यात आला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व निर्णय घेण्यासंदर्भातील सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-१०-२०१७) :** (१) केंद्र शासनाने ग्रामीण भागाकरिता दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजना व शहरी भागाकरिता एकात्मिक ऊर्जा विकास योजना (आय.पी.डी.एस.) जाहीर केली आहे. दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेअंतर्गत राज्यातील ३३ जिल्ह्यातील रु.२१६४.१५ किंमतीच्या ३७ प्रकल्पास व एकात्मिक ऊर्जा विकास योजनेअंतर्गत राज्यातील ३५ जिल्ह्यातील रु. २४०५.०८ किंमतीच्या ४४ प्रकल्पास मंजुरी दिली आहे.
(२) व (३) दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेमधील अंतर्भूत कामे खालील प्रमाणे आहेत:-

१) अकृषिक ग्राहकांना स्वतंत्र फिडरद्वारे २४ X ७ वीज पुरवठा करणे. कृषी व अकृषिक फिडर विलगीकरण करणे

२) ग्रामीण भागातील वीज वितरण प्रणालीचे सक्षमीकरण, श्रेणीवर्धन व बळकटीकरण करणे

३) ग्रामीण भागातील व दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांच्या धरांसाठी नवीन वीजजोडणी देणे व इतर ग्रामीण घरकुलांना वीज जोडणी देण्यासाठी लागणारी वीज वितरण यंत्रणा उभारणे

४) संसद आदर्श ग्राम योजनेच्या गावांमध्ये वीज वितरण प्रणालीचे सक्षमीकरण, आधुनिकीकरण करणे.

तसेच एकात्मिक ऊर्जा विकास योजनेमधील अंतर्भूत कामे खालीलप्रमाणे आहेत :-

१) शहरी भागातील वीज ग्राहकांना २४ X ७ वीज पुरवठा करणे

२) शहरी भागातील वीजवितरण प्रणालीचे सक्षमीकरण, बळकटी करणे, सर्व पातळीवर वीजमापक बसवून योग्य ऊर्जा अंकेक्षण (Energy Audit) करणे

३) शहरी भागातील घरगुती, वाणिज्य व औद्योगिक ग्राहकांसाठी वीजजोडण्या देण्यासाठी लागणारी वीजवितरण यंत्रणा उभारणे

४) शहरी भागातील वीजविरण प्रणालीचे सक्षमीकरण करणे.

उपरोक्त दोन्ही योजनांसाठी प्रकल्प अहवालाच्या ६०% रक्कम अनुदान स्वरुपात केंद्र शासनाकडून मिळणार असून उर्वरित ४०% रक्कम महावितरण कंपनी वित्तीय संस्थांकडून कर्ज स्वरुपात उभी करणार आहे. सदर दोन्ही योजनेतंर्गत कामे प्रगतीपथावर आहेत.

---

**मुंबई महानगर गॅस प्राधिकरणातील गॅस स्टेशनवर सीएनजीचा पुरवठा अचानक बंद करण्यात आल्याबाबत**

**(२६) ८३००७ (०६-०५-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानगर गॅस लिमिटेडच्या वडाळा, म्हापे, तळोजा, अंबरनाथ येथील महत्वाच्या गॅस पुरवठादारांकडून मुंबई महानगर गॅस प्राधिकरणातील सुमारे १९० सीएनजी गॅस स्टेशनला गॅस पुरवठा केला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २० डिसेंबर, २०१६ रोजी पहाटे तीन वाजल्यापासून काही गॅस स्टेशनवर गॅसचा पुरवठा न करण्यास कर्मचाऱ्यांवर जबरदस्ती करण्यात आल्याने भितीपोटी संपूर्ण गॅस प्राधिकरणातील गॅस स्टेशनचा गॅस पुरवठा बंद केल्यामुळे मुंबईसह अन्य ठिकाणच्या काळा-पिवळ्या रिक्षा, टॅक्सी व खाजगी टॅक्सी सेवावर त्याचा परिणाम झाला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, सीएनजीचा पुरवठा अचानक बंद करणाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच सीएनजी स्टेशनच्या संरक्षणाच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१४-०९-२०१७) :** (१) हे खरे आहे.

मुंबई महानगर गॅस प्राधिकरणातील १९९ सीएनजी गॅस स्टेशनकडून गॅस पुरवठा केला जातो.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

दिनांक २० डिसेंबर, २०१६ रोजी पहाटे तीन पासून अचानकपणे ६० सीएनजी ऑपरेटर्स यांनी वेतनवाढीसाठी काम बंद केले. तथापि, या कर्मचाऱ्यांना महानगर गॅस लि. यांचेकडून किमान वेतन कायदयानुसार वेतन दिले जाते. तसेच महानगर गॅस यांच्या कर्मचाऱ्यांनी गंभीर परिस्थिती अत्यंत कुशलतेने हाताळली आहे.

(४) व (५) सदर कर्मचाऱ्यांविरुध्द महानगर गॅस लि. यांनी मुंबई उच्च न्यायालयात सिव्हिल याचिका दाखल केली असून मा. न्यायालयाने दिनांक ८ मार्च, २०१७ च्या आदेशान्वये त्या कर्मचाऱ्यांना सीएनजी स्टेशनच्या २० मीटरच्या परिसरात मज्जाव केला आहे. परिस्थिती पुर्णत: नियंत्रणात आहे.

---

## शिवशंकर नगर, सुंदरखेड (ता.जि.बुलडाणा) या रहिवासी वसाहतीवरून उच्च दाब वाहिनी स्थलांतरीत करण्याबाबत

**(२७) ८३११६ (२८-०४-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवशंकर नगर, सुंदरखेड (ता.जि.बुलडाणा) या रहिवासी वसाहतीवरून उच्च दाब वाहिनी हटविण्याबाबत स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा मागणी व आंदोलन करूनही सदर विद्युत वाहिनी अद्यापही हटविण्यात आली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त अति उच्च दाबाच्या विद्युत वाहिनीमुळे दुर्घटना, अपघात होऊन मृत्यू देखील झालेला असून या पुढेही अशा प्रकारे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही, हे देखील खरे आहे काय,

(३) असल्यास, या बाबत शासनाने पाहणी केली आहे काय व त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-१०-२०१७) :** (१) शिवशंकर नगर, सुंदरखेड या वसाहतीमध्ये अस्तित्वात असलेली वाहिनी ही त्यावेळेस पूर्णपणे खुल्या शेत जमीनीवर उभारण्यात आली होती. सुंदरखेड ग्रामपंचायत जिल्हा मुख्यालयाजवळ असल्यामुळे या हद्दीत बांधकाम करणाऱ्यांचे प्रमाण वाढले. बऱ्याच लोकांनी विद्युत वाहिनीखाली अनधिकृतपणे घरे बांधलेली आहेत. सदर वाहिनी व घराचे छत यामध्ये विद्युत कायद्यातील तरतुदीनुसार योग्य अंतर ठेवण्यात आलेले नाही. अशा बांधकामधारकांना नियमबाहय बांधकाम न करण्याबाबत महावितरण कंपनीकडून सूचना देण्यात आल्या आहेत. सदर बांधकामधारकांना महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. च्या नियमानुसार आवश्यक रकमेचा भरणा करुन उपरीतार

वाहिनी स्थलांतरित करण्यासंबंधी वेळोवेळी सांगण्यात आले होते. परंतु वाहिनी स्थलांतरीत करण्यासंबंधी कामे ही महावितरण कंपनीमार्फत करण्यात यावी अशी वेळोवेळी मागणी बांधकामधारकांनी केलेली आहे.

(२) व (३) सदर परिसरातील उपरी तार वाहिनी सुरक्षितरित्या स्थलांतरित करण्यासाठी निधीच्या तरतुदीकरिता व मंजूरीकरिता अंदाजपत्रक जिल्हा नियोजन समिती, बुलढाणा यांच्याकडे सादर करण्यात आले असून निधीच्या उपलब्धतेनुसार काम करण्यात येईल. यासंदर्भात महावितरण कंपनीमार्फत नियोजन समिती, बुलढाणा यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपुर विभागातील जात वैधता पडताळणीची प्रकरणे स्वाक्षरीकरिता प्रलंबित असल्याबाबत**

**(२८) ८४१८६ (२१-०४-२०१७). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपुर विभागातील नागपुर, चंद्रपुर, गडचिरोली, भंडारा व गोंदिया या पाच जिल्ह्यातील अनु. जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील तब्बल ३० हजार जात वैधता पडताळणीची प्रकरणे स्वाक्षरीकरिता प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यात चंद्रपुर, गडचिरोली, भंडारा व गोंदिया येथील जात वैधता पडताळणी समितीचे अध्यक्षपद रिक्त असल्याने नागपूर येथील अध्यक्षांकडे या जिल्हाची धुरा सोपविण्यात आली असल्याने सदर प्रकरण प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जात वैधता प्रमाणपत्राअभावी अभियांत्रीकी आणि वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या जागांवर प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना महाविद्यातील अधिकाऱ्यांची मनधरणी करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने यासंदर्भात चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशी अंती काय निष्पन्न झाले व सदरहू समस्येचे निराकरण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. राजकुमार बडोले (११-१०-२०१७) :** (१) हे खरे नाही.

नागपूर विभागातील तत्कालीन विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, नागपूर व समिती क्र.२, चंद्रपूर मध्ये एकत्रित माहे जानेवारी, २०१६ अखेर जात वैधता पडताळणीची ३६६६ प्रकरणे सह्यांसाठी प्रलंबित होती. तथापि,शासन निर्णय दि.११/११/२०१६ अन्वये जिल्हानिहाय समित्यांचे प्रत्यक्षात कामकाज सुरु झाले असून नागपूर विभागातील नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली व वर्धा या जिल्ह्यातील समित्यांकडे माहे जानेवारी, २०१७ अखेर एकूण ३१९५६ प्रकरणे प्रलंबित होती. खास मोहिमेअंती प्रकरणे निकाली

काढण्यात येत असून नागपूर विभागातील समित्यांकडे जून,२०१७ अखेर १४७७० प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यातील ५७३७ प्रकरणे त्रुटीची असून प्रत्यक्षात ९०३३ प्रकरणे समिती स्तरावर प्रलंबित आहेत.

(२) हे खरे आहे.

तथापि, महसूल व वन विभाग, शासन आदेश दि.२६/०७/२०१७ अन्वये नागपूर, चंद्रपूर व भंडारा समितीवर अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली असून उर्वरित समित्यांवर अध्यक्ष नियुक्तीची प्रक्रिया शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) हे खरे नाही.

(४) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) जात प्रमाणपत्र पडताळणी प्रकरणात त्रुटी असल्यास समितीकडून संबंधित अर्जदारास त्रुटी पूर्तता करणेबाबत कळविले जाते व अर्जदाराने योग्य त्रुटीपूर्तता केली असल्यास सदर नस्तीवर तात्काळ निर्णय घेण्यात येतो. तसेच प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी संबंधित समितीच्या वतीने नियमितपणे विशेष मोहिमांचे आयोजन केले जात आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मा.पंतप्रधानांनी शेतकऱ्यांना पीक कर्जावरील व्याज माफी या घोषणेची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत**

**(२९) ८४५७५ (२४-०४-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.पंतप्रधानांनी शेतकऱ्यांना पीक कर्जावरील दोन महिन्यांची व्याज माफी करण्याची घोषणा राज्यातील शेतकऱ्यांकरिता निरुपयोगी ठरली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा बँकेकडून शेतकऱ्यांना ४० हजार रुपये कर्ज दिले असेल तर त्यावर केवळ २०० रुपयांची सुट मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने सदर घोषणेची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-१०-२०१७) :** (१) व (२) नाही.

(३) सदर योजना केंद्र शासनाची असून नाबार्डमार्फत राबविली जात आहे. राज्य शासनाचा योजनेत सहभाग नसल्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बारामती तालुक्यातील (जि.पुणे) ऊस उत्पादनाच्या प्रमाणात माळेगाव सहकारी साखर कारखान्याची क्षमता अपुरी पडत असल्याबाबत**

**(३०) ८४९०८ (१८-०८-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बारामती तालुक्यातील (जि.पुणे) ऊस उत्पादनाच्या प्रमाणात माळेगाव सहकारी साखर कारखान्याची क्षमता अपुरी पडत असल्याची बाब दिनांक १५ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उत्पादनाचे प्रमाण पाहता बारामती मधील शेतकऱ्यांची अतिशय गैरसोय होत असल्याने साखर कारखान्याच्या शेतकरी बचाव सहकारी मंडळाने शासनास माळेगाव सहकारी साखर कारखान्याची क्षमता वाढविण्याबाबत कार्यवाहीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२८-०९-२०१७) :** (१) होय.

(२), (३) व (४) माळेगाव सहकारी साखर कारखान्याची गाळप क्षमता वाढविण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला असून त्यानुषंगाने केंद्र शासनास अभिप्राय कळविण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

---

**राज्यातील सहकारी सूतगिरण्यांना विविध कारणांमुळे होत असलेला तोटा**

**(३१) ८४९०९ (०९-०८-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व सहकारी सूतगिरण्या विविध कारणांमुळे सध्या तोट्यात असल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तोट्यात असणाऱ्या सूतगिरण्यांची संख्या २८ असून याचा आढावा घेण्यासाठी शासनाने वस्त्रोद्योग विभागाचा अभ्यास गट स्थापन केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अभ्यास गटाचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, त्यामध्ये काय निदर्शनास आले व सदर अहवालाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच सहकारी सुत गिरण्यांची तुट भरून काढण्याच्या दृष्टीने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०७-१०-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे. राज्यातील सहकारी सूतगिरण्या तोट्यात असल्याची बाब माहे जून, २०१६ च्या दरम्यान निदर्शनास आली आहे.
(२) राज्यातील शासकीय अर्थसहाय्यीत १३२ सूतगिरण्या आहेत. त्यापैकी ६७ उत्पादनाखाली असून त्यापैकी ७ सूतगिरण्या कशामुळे नफ्यात व इतर कशामुळे तोट्यात आहेत याचा अभ्यास करण्यासाठी संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली दि.१६.१.२०१७ च्या शासन निर्णयान्वये अभ्यास गट (समिती) स्थापन केला आहे.
(३), (४), (५) व (६) सदर समितीची दि.३१.१.२०१७ व दि.१०.२.२०१७ रोजी बैठक झाली असून याबाबतचा अहवाल शासनास प्राप्त होणे बाकी आहे.

---

**नाशिक जिल्ह्यासह राज्यातील हजारो शेतकरी दहा महिन्यांपासून कांद्याला जाहीर केलेल्या अनुदानापासून वंचित असल्याबाबत**

**(३२) ८४९६३ (१८-०८-२०१७). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यशासनाने कांदाला जाहीर केलेल्या अनुदानापासून राज्यातील हजारो शेतकरी दहा महिन्यांपासून वंचित असल्याचे माहे मे,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक येथील बाजार समित्यांमध्ये कांदा विकणाऱ्या शेतकऱ्यांना प्रतिकिलोमागे १ रुपया अनुदान देण्याच्या घेतलेल्या निर्णयानुसार कांदा उत्पादक शेतकऱ्यांना माहे मे, २०१७ पर्यंत एक रुपयाही अनुदान देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर अनुदानापासून वंचित शेतकऱ्यांना त्यांचे थकीत अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१८-०९-२०१७) :** (१) होय.
(२) व (३) राज्यातील ज्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी जुलै, २०१६ व ऑगस्ट, २०१६ या कालावधीत कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदा विक्री केली आहे. त्या शेतकऱ्यांना रुपये १००/-प्रति क्विंटल व २०० क्विंटल प्रति शेतकरी या प्रमाणे अनुदान देण्यासाठी शासन निर्णय दिनांक ३/७/२०१७ अन्वये रुपये ४३.४८ कोटी निधी उपलब्ध करुन वितरीत करण्यात आला आहे. दिनांक ८/९/२०१७ अखेर सदर अनुदानाचा लाभ राज्यातील १०१४५६ लाभार्थी

शेतकऱ्यांना आला असून त्यांना अनुदानाची रक्कम रुपये ४०.९११० कोटी वितरित केली आहे. उर्वरित लाभार्थी शेतकऱ्यांना निधी वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वसंतदादा सहकारी बँकेतील सर्वसामान्य ठेवीदारांच्या ठेवी परत मिळण्याबाबत**

**(३३) ८५१४२ (१८-०८-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील एकूण ७३ नागरी सहकारी बँकेच्या दोषी संचालक आणि अधिकारी यांच्यावर राज्य शासनाने दिनांक ३० नोव्हेंबर, २०१६ अखेर आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करून त्यांच्याकडून वसुली करण्यासाठी वसुली प्रमाणपत्र दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य शासनाने केलेल्या सदरहू कारवाईत वसंतदादा सहकारी बँकेचा समावेश नसून सदर बँकेने सहकार विभागाची पूर्व परवानगी न घेता मुंबईतील गोरेगाव आणि डीलाईल रोड येथील मालमत्ता विकली असून सर्वसामान्य ठेवीदारांच्या सुमारे १७५ कोटी रुपयांच्या ठेवी मात्र दिलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर बँकेच्या गैरकारभाराची चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) तसेच सदर बँकेतील सर्वसामान्य ठेवीदारांच्या ठेवी परत मिळवून देण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१६-१०-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील ७३ नागरी सहकारी बँकांचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी करण्याचे आदेश पारीत करण्यात आले आहेत. त्यापैकी २६ नागरी सहकारी बँकांच्या चौकशीचे कामकाज पूर्ण झाले असून त्यामधील १६ बँकांमधील ३६४ अपचारीं व्यक्तींविरुद्ध रु. १५.९३ कोटी रक्कमेची वसूली प्रमाणपत्रे निर्गमीत करण्यात आलेली आहेत.
(२) व (३) उपरोक्त ७३ नागरी सहकारी बँकांमध्ये वसंतदादा सहकारी बँकाचा देखील समावेश असून दिनांक ४.७.२००८ रोजीच्या आदेशान्वये सदर बँकेची अधिनियमाच्या कलम ८८ अन्वये चौकशी सुरु आहे.

बँकेच्या गोरेगाव शाखेची मालमत्ता विक्री करण्यासाठी सहकार आयुक्तांनी त्यांच्या दिनांक १८.३.२०१४ रोजीच्या पत्रान्वये मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार सदर मालमत्तेची विक्री करुन प्राप्त झालेली रक्कम डी आय सी जी सी यांचेकडे भरणा केलेली आहे. मात्र बँकेची डिलाईल रोड (ना.म.जोशी मार्ग, परेल) शाखेची मालमत्ता विक्री केलेली नाही.
(४) व (५) प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७२(३) अन्वये दिनांक ९.८.२०१६ रोजी बँकेचे संचालक, मयत संचालकांचे वारस व अधिकारी अशा एकूण ४० जणांवर आरोपपत्र ठेवले आहे. अधिनियमाच्या कलम ७२(५) अन्वये पुढील चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

बँकेच्या अवसायनाच्या आदेशानंतर ६१,४७४ ठेवीदारांना रु.१५४.५० कोटी इतक्या रक्कमेच्या ठेवींचे वाटप करण्यात आले आहे. तसेच बँकेचे थकीत कर्जवसूलीसाठी विविध न्यायालयात १,३६३ कर्जखात्यांवर रु.९१.९१ कोटी रक्कमेचे दावे दाखल करण्यात आले आहेत.

---

**शेवगाव-पाथर्डी रस्त्यावर (जि.अहमदनगर) तूरीच्या पोत्यांनी भरलेले दोन ट्रक स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने ताब्यात घेतल्याबाबत**

**(३४) *८५२३५* (१८-०८-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेवगाव-पाथर्डी रोडवर (जि.अहमदनगर) येथे तूरीच्या पोत्यांनी भरलेले दोन ट्रक स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दिनांक ०४ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास ताब्यात घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधीत तूर कोठून भरली व कोठे नेण्यात येत होती याबाबत विचारणा केली असता ट्रकसोबत असलेल्या व्यक्तींना माहिती सांगता आली नसल्याने सदर ट्रक एमआयडीसी पोलीसांनी ताब्यात घेतल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत पोलिसांनी नाफेडच्या अधिकाऱ्यांना माहिती मागितली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०७-१०-२०१७) :** (१) होय.

(२) स्थानिक गुन्हे शाखा, अहमदनगर यांना तूरीच्या पोत्यांनी भरलेले दोन ट्रक संशयितरित्या आढळून आल्याने MIDC, पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे जमा केले होते.

(३) होय.

(४) तूर खरेदी केंद्र तिसगांव, ता.पाथर्डी येथील खरेदी केलेली तूर भोसरी, पुणे येथील वखार महामंडळाच्या गोदामामध्ये पाठविण्यात आली होती.तथापि, दिनांक २/५/२०१७ पर्यत भोसरी, पुणे येथे पोहोचली नसल्याने बाजार समितीने संचालक मंडळाची सभा घेऊन संबंधित वाहन चालक व गाडी मालक यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यासाठी ठराव घेऊन पोलीस स्टेशन पाथर्डी येथे तक्रार दाखल केली होती.तद्नंतर दिनांक १/७/२०१७ रोजी FIR क्रमांक ४०५/२०१७ भारवि १८६० चे कलम ४०६,४२० नुसार गुन्हा दाखल केलेला आहे.

बाजार समितीने सबएजंन्ट संस्था म्हणून काम करताना करारनाम्यातील अटींचे उल्लंघन केले असल्याने,बाजार समितींची सबएजंन्ट संस्था म्हणून केलेली नेमणूक रद्द केलेली आहे.

दरम्यानच्या काळात ट्रकमधील तूर खराब होऊ नये यासाठी जिल्हा पणन अधिकारी यांनी तूर ताब्यात घेऊन दुसऱ्या ट्रकमध्ये भरुन वखार महामंडळाच्या भोसरी, पुणे येथील गोदामात जमा केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकण विकास महामंडळ बंद करण्याच्या धोरणात्मक निर्णयाबाबत**

**(३५) ८५७१५ (१८-०८-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.सुनिल शिंदे (वरळी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या चार जिल्ह्यांमध्ये उद्योग व औद्योगिकीकरणात नियोजनबध्द वाढ होऊन कोकणाचा विकास करण्याच्या उद्देशाने सन १९७० मध्ये स्थापन केलेले कोकण विकास महामंडळ बंद करण्याचा धोरणात्मक निर्णय राज्य सरकारने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकण विकास महामंडळ बंद करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, महामंडळ बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतल्यानंतर महामंडळाच्या अखत्यारितीतील दुय्यम कंपन्या आणि हाती असलेले किती प्रकल्प बंद करण्यात आले आहेत व किती प्रकल्प अद्याप सुरु आहेत,

(४) असल्यास, सदरहू मंडळ बंद करण्यासाठी, त्वरीत शासन आदेश जारी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१८-०९-२०१७) :** (१) होय.

(२) महामंडळाने सुरु केलेले प्रकल्प बाजारपेठ जवळ नसल्याने व सहयोगी खाजगी कंपन्यानी सहभाग काढून घेतल्याने, भांडवल उपलब्ध नसल्याने तोटयात गेले. परिणामी महामंडळाचा संचित तोटा वाढत गेला, त्यामुळे शासनाने महामंडळ बंद करण्याचा निर्णय घेतला.

(३) या महामंडळाच्या ४ दुय्यम कंपन्या पैकी (१) कोंकण क्रिस्टल सॉल्ट अँड मरीन केमिकल्स, (२) कोंकण डेअरी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि., (३) कोंकण सी फुडस् प्रा.लि. या तीन कंपन्या बंद केल्या आहेत.

या महामंडळाची ४) मे.सहयाद्री ग्लास वर्क्स प्रा.लि. ही दुय्यम कंपनी उद्योग पुनर्रचना मंडळ, नवी दिल्ली यांच्या नोव्हेंबर, १९९३ मध्ये दिलेल्या आदेशानुसार परिसमापीत करण्याची कार्यवाही सुरू आहे.

तसेच काथ्या प्रकल्प, जहाज तोडणी प्रकल्प, रबर प्रकल्प व तेलताड प्रकल्प बंद करण्यांत आले आहेत.

मीठ प्रकल्पाच्या जागेवर मे.किंग्ज प्रॉन्स लि. या कंपनी तर्फे कोळंबी उत्पादन घेतले जात आहे.

या महामंडळाचे १) जैविक केंद्र व २) सफाळे, जिल्हा पालघर येथे १५०० एकर खाजण जमिनीवर मे.पंचम ॲक्वा कल्चर लि. या खाजगी कंपनीच्या सहाय्याने चालविण्यात येत असलेला “कोळंबी उत्पादन” असे २ प्रकल्प सुरु आहेत. जैविक केंद्र प्रकल्प सार्वजनिक उद्योग पुर्नरचना मंडळ, महाराष्ट्र शासन यांनी दिलेल्या आदेशानुसार सुरु आहे.

(४) सदर महामंडळ बंद करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने सन १९९२ मध्ये घेतला असून, महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम (पुनर्रचना व इतर विशेष तरतूदी) समितीच्या

दिनांक २४ जून, २००४ च्या आदेशानुसार व वित्त विभागाच्या दिनांक ३० जानेवारी, २००६ च्या शासन निर्णयान्वये परिसमापित करण्यात यावयाच्या चल व अचल मत्तांची विक्री विहित कार्यपध्दती अवलंबून शासनाच्या मान्यतेने मत्तांची विक्री केली आहे. मुलूंड (प.) येथील एक सदनिका वित्त विभागाची विहित कार्यपध्दती अवलंबून उच्च निविदाधारकास विक्री करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच कणकवली येथील बंद असलेली लघू औद्योगिक वसाहतीची जागा विक्रीचा प्रस्ताव उच्चाधिकार समितीकडे मान्यतेसाठी सादर केला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सहकारी साखर कारखान्याना ऊस गाळप व साखर उत्पादन मशिनरीमध्ये वाढ करण्याबाबत**

**(३६) ८७५६१ (१८-०८-२०१७). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना त्यांच्या ऊस गाळप व साखर उत्पादन मशिनरीमध्ये वाढ करण्यास शासन परवानगी देणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साखर कारखान्यांची गाळप क्षमता वाढविणेबाबतचे ३४ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कारखान्यांना परवानगी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-१०-२०१७) :** (१) होय. मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल पी.एल.आय. नं. २०/२००६ च्या अनुषंगाने काही सहकारी साखर कारखान्यांनी स्वतंत्ररित्या कारखान्यांचे विस्तारीकरण/ आधुनिकीकरण/बदल/ वाढीव कार्यक्रम इत्यादींसाठी सिव्हील ॲप्लिकेशन दाखल केलेले होते. यात मा. उच्च न्यायालयाने एकत्रित आदेश दिलेले आहेत. सदर आदेशातील निकषांप्रमाणे व मा. न्यायालयाच्या निर्णयास अधीन राहून तसेच शासनाच्या प्रचलित धोरणानुसार प्रकरण तपासून साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या स्तरावरून आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिली जाते.

(२) होय.

(३) राज्य शासनाने २५ (१३ सहकारी व १२ खाजगी) साखर कारखान्यांच्या गाळप क्षमता वाढीकरिता ऊस उपलब्धतेबाबत केंद्र शासनास अभिप्राय सादर केले आहेत. उर्वरित ९ (५ सहकारी व ४ खाजगी) साखर कारखान्यांचे प्रस्तावाबाबत कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पावरग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया या कंपनीकडून टाकलेल्या उच्च विद्युत दाबाच्या वाहिनीमुळे शेतकरी व नागरिकांना शॉक बसत असल्याबाबत

**(३७) ८८०५४ (०९-०८-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पॉवरग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया या कंपनीकडून ७६५ के.व्ही.ची विद्युतवाहिनी सोलापूर ते पुणे दरम्यान टाकण्याचे काम करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाहिनीमुळे सोलापूर जिल्ह्यातील गावांमधील शेतकरी व नागरिकांना या उच्च विद्युत दाबाच्या वाहिनीमुळे शॉक बसत असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी व शेतकऱ्यांनी पॉवरग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया व राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान अनेक वेळा केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने ७६५ के.व्ही. या उच्च विद्युत दाबाच्या वाहिनीमुळे शॉक लागून वित्तीय व जीवित हानी होऊ नये यासाठी आतापर्यंत शासनाने कोणत्या सुरक्षात्मक उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) पॉवर ग्रीड कंपनी कडे यासंदर्भात कोणतीही घटना किंवा तक्रार प्राप्त झालेली नाही. पॉवर ग्रीड कंपनीव्दारे भारतीय मानके लक्षात घेऊन पारेषण वाहिन्या उभारण्यात येतात. ज्यामध्ये पारेषण वाहिन्यांची आर्थिंग तथा टॉवरच्या प्रतिरोध अंतराबाबत विशेष लक्ष देण्यात येते. तसेच पारेषण वाहिन्यांचे निरीक्षण केंद्रीय विद्युत प्राधिकरण (CEA) यांच्याकडून करण्यात येऊन त्यांच्या परवानगीनंतरच वाहिनी कार्यान्वित करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील साखर कारखान्यांना महसूली उत्पन्न विभागणीच्या आधारे ऊसाचा दर ठरविण्याबाबत

**(३८) ८८०५५ (१८-०८-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील साखर कारखान्यांना ऊस दराच्या सन २०१३ च्या कायद्यान्वये एफआरपी व्यतिरिक्त महसूली उत्पन्न विभागणीच्या आधारे ऊस दर ठरविण्यासाठी राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली ऊस नियंत्रण मंडळ गठीत करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २०१३ च्या कायद्यातील तरतूदीनुसार प्रत्येक कारखान्यासाठी काय तरतूदी आहेत व त्यानुषंगाने ऊस दर निश्चितीबाबतची कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२८-०९-२०१७) :** (१) होय.
(२) ऊस नियंत्रण मंडळामार्फत कारखान्यांचे उत्पन्न विभागणीच्या आधारे निघणारा दर व रास्त व किफायतशीर दर (एफ.आर.पी.) यामध्ये जादा निघणाऱ्या दरास अंतिम ऊसदर म्हणून मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य शासनाने नविन उद्योग उभारणीसाठी मुद्रांक शुल्क माफ केल्याबाबत**

**(३९) ८८१८४ (१८-०८-२०१७). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सामुहिक प्रोत्साहन योजनांकरिता सन २०१३ मध्ये शासनाने नविन उद्योग उभारणीसाठी मुद्रांक शुल्क माफ केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जमीन खरेदी, जमिनीचा भाडेपट्टा, प्रकल्प उभारणीसाठी भागभांडवल करिता, प्रकल्पाचा विस्तार करण्यासाठी शासनाने शुल्क माफ करण्याचे सन १९९३ चे धोरण लागू असतांना मुद्रांक शुल्क माफ करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाचे उद्योग विभाग व महसूल विभाग यांनी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामध्ये विसंगती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उद्योग संचालनालय, मुंबई यांनी केलेल्या अभिप्रायानुसार महसूल विभागाने मागील अडीच वर्षात मुद्रांक शुल्कामध्ये कोणतीही सुधारणा व दुरूस्ती न केल्याने पात्र उद्योजकास शासनाच्या उद्योग धोरणानुसार लाभ झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-१०-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ४.७ अन्वये उद्योगांना विविध प्रयोजनासाठी मुद्रांक शुल्क माफीची सवलत देय केली आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४) राज्यात माहे मार्च २०१७ पर्यंत एकूण ५९०७ उद्योगांना मुद्रांक शुल्क सवलत प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आली आहेत.तथापि, काही उद्योगांना विविध प्रयोजनार्थ प्रथम संलेखाकरीता मुद्रांक शुल्क माफीची सवलत गुंतवणुक कालावधीकरीता उपभोगता येत नसल्याची बाब महसूल विभागाच्या निदर्शनास आणून त्यात सुधारणा करण्याचा प्रस्ताव महसूल विभागाकडे विचाराधीन आहे.
(५) महसूल विभागामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**किन्होळा (ता.पाथरी, जि.परभणी) येथील तूरीला रास्तभाव मिळत नसल्याबाबत**

**(४०) ८९०३३ (१८-०८-२०१७). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किन्होळा (ता.पाथरी, जि.परभणी) येथील शेतकऱ्यांनी दिनांक २६ एप्रिल, २०१७ रोजी बाजारात नेलेल्या तूरीला योग्य भाव न मिळाल्यामुळे तूर घरी परत आणून पेटवून दिल्याने सदर आगीत तूरीसह, कापूस, गहू व सोयाबीन ही धान्य पिके जळून राख झाल्याची घटना दिनांक २७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले, तसेच संबंधित शेतकऱ्यास झालेल्या नुकसानीबाबत अर्थसहाय्य करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून तसेच शेतमालाला हमीभाव देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०७-१०-२०१७) :** (१) श्री.किशन कणसे, किन्होळा, जि.परभणी यांनी दिनांक २६/४/२०१७ रोजी कुंभारी पिंपळगांव येथील आठवडी बाजारात विक्रीसाठी नेलेल्या तुरीला योग्य भाव मिळाला नसल्याने, दिनांक २७/४/२०१७ रोजी घरातील तुरीला लावलेल्या आगीत फक्त तुरीचे पिकच जळालेले आहे व अन्य पिके जळालेली नाहीत.

(२) व (३) श्री.कणसे अथवा गावातील अन्य गावकऱ्यांनी सदर घटनेबाबत व कोणत्याही शासकीय कार्यालयास सुचित केले नसल्याने, या घटनेसंदर्भात शासकीय चौकशी अथवा पंचनामा झालेला नाही. तथापि, प्रस्तुत प्रश्नाच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीत पुढीलप्रमाणे वस्तुस्थिती निदर्शनास आली आहे:-

श्री.कणसे, किन्होळा, जि.परभणी यांनी एकूण १६ एकर शेतीपैकी ५ एकर शेतीमध्ये तुरीचे पिक घेतले होते व अंदाजे १३ क्विंटल तुरीचे उत्पादन झालेले होते. किन्होळा गावातील शेतकरी गावापासून ३० कि.मी. अंतरावर असलेल्या कुंभारी पिंपळगांव, जि.जालना, येथील आठवडी बाजारात खाजगी व्यापाऱ्यांना अनेक वर्षापासून शेतमालाची विक्री करत असल्याने आणि व्यापाऱ्यांकडून शेतमाल खरेदीसाठी कोणतेही निकष न लावता शेतकऱ्यांनी आणलेला माल खरेदी करुन त्याचे पैसे अदा केले जात असल्याने,श्री.कणसे यांनी दिनांक २६/४/२०१७ रोजी कुंभारी पिंपळगांव येथील आठवडी बाजारात तूर विक्रीसाठी नेली असता,व्यापाऱ्यांनी त्यांच्या तूरीसाठी रुपये १८००-२००० इतका कमी भाव सांगितल्यामुळे श्री.कणसे यांनी त्या दिवशी तुरीची विक्री न करता तूर घरी आणली व दुसऱ्या दिवशी त्या तुरीला आग लावली, त्यात सर्व तूर जळून खाक झाली व अन्य पिके जळालेली नाहीत. सदर घटनेबाबात श्री.कणसे अथवा गावातील अन्य गावकरी यांच्याकडून झालेल्या नुकसानीबाबत अर्थसहाय्य मिळण्यासाठी कोणतेही निवेदन/ अर्ज शासकीय कार्यालयांना दिलेला नाही.

(४) हंगाम २०१६-१७ मध्ये राज्यात झालेल्या तूरीची मुबलक उत्पादनामुळे केंद्रशासनाच्या व राज्यशासनाच्या विविध योजनांमध्ये एकूण ७६.७६ लाख तूरीची खरेदी केली असून ४.१५ लाख शेतकऱ्यांना त्याचा लाभ झालेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यात पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत दाखल करण्यात आलेल्या ५०० प्रस्तावांना मंजूरी मिळण्याबाबत**

**(४१) ८९८२८ (१८-०८-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यात पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत सन २०१६-१७ मध्ये जिल्हा उद्योग कार्यालयाकडे ७०९ प्रस्ताव दाखल करण्यात आले असल्याचे माहे एप्रिल,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावापैकी ५१६ प्रस्ताव बँकेकडे पाठविले असता त्यातील आतापर्यंत केवळ १६ प्रस्तावांनाच मंजूरी मिळाल्याने तब्बल ५०० प्रस्तावांची मंजूरी अजूनही प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे सदर ५०० प्रस्तावांना बँकांकडून मंजूरी मिळावी यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२२-०९-२०१७) :** (१) होय खरे आहे.

पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्याक्रमांतर्गत जिल्हा उद्योग केंद्र हिंगोली, कार्यालयास सन २०१६-१७ मध्ये ४१ प्रकल्पांचे भौतिक व ८२.०० लाख रुपयाचे मार्जिन मनीचे अनूदानाचे लक्षांक दिलेले आहे. सन २०१६-१७ मध्ये केंद्रशासनाने सदर योजनेची संपूर्ण अंमलबजावणी ऑनलाईन कार्यप्रणालीद्वारे करण्याचे निर्देशानुसार, हिंगोली जिल्ह्यासाठी सन २०१६-१७ मध्ये योजनेतंर्गत एकुण ९३२ प्रस्ताव प्राप्त झालेले होते. सदर प्रस्तावांची जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या 'जिल्हा कार्यबल समिती' कडे छाननी करुन ७०९ प्रस्ताव शिफारसी करीता सादर करण्यात आलेले होते.
(२) अंशत: खरे आहे.

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत 'जिल्हा कार्यबल समितीने' एकुण ५५६ प्रस्तावांची शिफारस केलेली असुन, विविध बँकाना कर्ज मंजुरीच्या पुढील प्रक्रियेकरिता पाठविण्यात आलेले आहेत. सदर प्रस्तावापैकी विविध बँकाकडून ७७ प्रस्तावांना (समाविष्ट अनुदान रक्कम रू.९५.६७ लक्ष) मंजूरी मिळालेली आहे. योजनेतंर्गत जिल्हयाचे सन २०१६-१७ चे उद्दिष्ट पूर्ण झालेले असून, प्रलंबित प्रस्ताव सन २०१७-१८ करीताच्या उद्दिष्ट पूर्ततेसाठी विचाराधीन आहेत.

(३) सन २०१७-१८ करीता हिंगोली जिल्हा उद्योग केंद्र, कार्यालयास २५ प्रस्तावांचे भौतिक व रक्कम रू.४९.४३ लक्ष चे आर्थिक लक्षांक दिलेले असून सदर लक्षांकांची पूर्तता, मागील वर्षातील प्रलंबित प्रकरणे तसेच चालू वर्षात ऑनलाईन कार्यप्रणालीवर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांमधून करण्यात येणार आहे.

(४) लागू नाही.

---

**राज्यात कांद्याला उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव मिळण्याबाबत**

**(४२) ९०३९४ (१८-०८-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मोठ्या प्रमाणात कांदा उत्पादन वाढल्यामुळे कांद्याचे प्रति क्विंटल बाजार भाव सातत्याने कमी होत असून दिनांक २१ जून,२०१७ रोजी वा त्या सुमारास कृषी उत्पन्न बाजार समिती लासलगांव (ता.निफाड, जि.नाशिक) या बाजार समितीत १२५/- रुपये प्रति क्विंटल दराने कांद्याची विक्री झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कांद्याला मिळत असलेल्या कमी बाजार भावामुळे शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उत्पादन खर्चावर आधारित हमी भाव शेतकऱ्यांना मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची करणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०७-१०-२०१७) :** (१) व (२) राज्यात कांद्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे बाजार समितीमधील कांद्याची आवक वाढून कांद्याचे दर कमी झालेले आहेत. तथापि जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून कांद्यासाठी सरासरी प्रति क्विंटल २००० इतका बाजारभाव मिळत आहे.

दिनांक २१/६/२०१७ रोजी श्री.भिका पगार यांनी लासलगांव मुख्य बाजार आवारात विक्रीसाठी आणलेल्या ६ क्विंटल कांद्याची प्रत हलकी असल्याने, कांदा लिलावात व्यापाऱ्यांकडून त्यास रु.१२५/- प्रति क्विंटल अंतिम बोली लावली होती

प्रत्यक्षात बाजार समितीच्याआवारात मध्यम व निर्यातक्षम कांद्याची कमीत कमी रु.२५०/- व जास्तीत जास्त रु.६७०/- व सरासरी रु.५२५/- प्रति क्विंटल दराने विक्री झालेली आहे.

(३) कांदा हे नाशवंत पीक असल्याने, त्यास हमीभाव जाहीर केला जात नाही. तथापि, कांदा उत्पादक शेतकऱ्यांना योग्य भाव मिळावा यासाठी शासनाने पुढीलप्रमाणे कार्यवाही केलेली आहे:-

१) रु.१००/प्रति क्विंटल अनुदान मंजूर.

२) अन्य राज्यात कांदा वाहतुकीसाठी जादा रेल्वे वॅगन व रॅक्सची सोय.

३) कांदा निर्यातीसाठी असलेल्या MEIS योजनेचा कालावधी वेळोवेळी वाढवून घेतला असून, सध्या या योजनेचा कालावधी दिनांक ३० सप्टेंबर, २०१७ पर्यत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरोरा (जि.चंद्रपूर) येथील उत्पादन शुल्क कार्यालयातून**
**जप्त केलेली दारू चोरीला गेल्याबाबत**

**(४३) ९१६९७ (०९-०८-२०१७). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्यातील वरोरा येथील राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाने जप्त केलेली दारू चोरीला गेल्याचे दिनांक ७ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-०९-२०१७) :** (१) (२) व (३) होय. ही बाब दि.३.६.२०१७ रोजी निदर्शनास आली असून याप्रकरणी वरोरा पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, चंद्रपूर यांनी याप्रकरणी निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, वरोरा यांचेकडून खुलासा मागविला असून अशा घटनांची पुनरावृत्ती होवू नये म्हणून तेथील जवान / कर्मचारी यांना रात्र पाळीत काम करण्याचे निर्देश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात विविध औद्योगित वसाहतीमधील एकूण ४५ हजार ५०० उद्योग बंद असल्याबाबत.**

**(४४) ९१९५९ (१८-०८-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विविध औद्योगिक वसाहतीमधील एकूण ४५ हजार ५०० उद्योग सद्य:स्थितीत बंद पडलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेक इन इंडिया व मेक इन महाराष्ट्राच्या आजच्या काळात राज्यातील औद्योगिक वसाहतीमधील एकूण ३४ हजार एकरपेक्षा जास्त जमीन वापराविना पडून असल्याची बाब स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व उद्योग मंत्री यांना दिनांक २८ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बंद पडलेल्या उद्योगांमुळे राज्यात सुमारे २२ लाखाहून अधिक कामगार बेरोजगार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१८-०९-२०१७) :** (१) उद्योग संचालनालयाच्या जिल्हा स्तरावरील अभिलेख्यानुसार ४ थ्या औद्योगिक प्रगणनेच्या अहवालानुसार राज्यामध्ये ३४३२७ लघुउद्योग बंद पडलेले आहेत.

(२) होय.

(३) व (४) राज्यातील बंद पडलेल्या उद्योगांमुळे मार्च, २००७ च्या जनगणनेनुसार सुमारे १,३८,४३३ इतके कामगार बेरोजगार झाले आहेत.

बंद उद्योगांना उर्जितावस्थेत आणण्यासाठी शासनाकडून वेळोवेळी उपाययोजना करण्यात येतात. महाराष्ट्र औद्योगिक धोरण, २०१३ नुसार पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या तसेच बंद असलेल्या उपक्रमांना सुलभ निर्गमन पर्याय उपलब्ध होण्यासाठी आणि बंद उद्योग पुन्हा सुरु होण्यासाठी शासन निर्णय दिनांक २ मे, २०१३ अन्वये विशेष अभय योजना जाहिर केली होती.

सदर योजनेअंतर्गत जे उद्योग घटक विहित कार्यपध्दतीत योग्य ते निकष पुर्ण करतील अशा उद्योग घटकांना विशेष अभय योजनेद्वारा सुलभ निर्गमन पर्याय उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर योजनेमध्ये पात्र ठरणाऱ्या घटकांनी राज्य शासनाची सर्व मुद्दलाची रक्कम एकरकमी भरल्यास व्याज व दंड व्याज माफ करण्याची तरतूद आहे.

सदर योजनेस शासन निर्णय दिनांक ६ मे, २०१६ अन्वये दिनांक ३१ मार्च, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात कांदा उत्पादकांना देण्यात आलेल्या अनुदानाबाबत**

**(४५) ९२६२२ (१८-०८-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उत्पादन खर्चापेक्षा अत्यंत कमी भावाने कांदा विकावा लागत असल्याने शासनाने कांदा उत्पादकांना त्वरित अनुदान देण्याची मागणी नेवासा येथील शेतकऱ्यांनी (जि.अहमदनगर) तहसिलदार यांचेकडे दिनांक २२ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निवेदन देऊन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कांदा उत्पादकांना अनुदान देण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे, त्यांचे स्वरूप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१८-०९-२०१७) :** (१) होय.

(२) कांदा हे नाशवंत पीक असल्याने त्यास हमीभाव जाहीर कला जात नाही. परंतु राज्यातील ज्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी जुलै, २०१६ व ऑगस्ट, २०१६ या कालावधीत कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदा विक्री केली आहे. त्या शेतकऱ्यांना रुपये १००/- प्रति क्विंटल व २०० क्विंटल प्रति शेतकरी या प्रमाणे अनुदान देण्यासाठी शासन निर्णय दिनांक ३/७/२०१७ अन्वये

रुपये ४३.४८ कोटी निधी उपलब्ध करुन वितरीत करण्यात आला आहे. अहमदनगर जिल्ह्यातील ३९९३२ लाभार्थी शेतकऱ्यांना रुपये १६०७ कोटी निधी वितरीत करण्यात आला असून, उर्वरित ५५७२ शेतकऱ्यांच्या निधी वितरणाची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पेसा निधी योजनेच्या अंतर्गत धारणी पं.स.स्तरावरून (जि.अमरावती) नियमबाह्य साहित्य खरेदी करण्यात आल्याबाबत

**(४६) ९२६४० (०९-०८-२०१७). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पेसा योजनेच्या अंतर्गत धारणी पं.स.स्तरावरून (जि.अमरावती) नियमबाह्य साहित्य खरेदी करण्यात आली असून साहित्य खरेदीत ग्रामसभेला विश्वासात घेतले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विषयाबाबत ग्रामसभा बोलविणे ग्राम सचिवाकडून बंधनकारक असते मात्र पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी आणि ग्राम सचिवाने याबाबत ग्रामसभेला विश्वासात न घेण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार निधीचा अपहार झाला असल्यास अपहार करणा-यांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२१-०९-२०१७) :** (१) नाही.
ग्रामपंचायत स्तरावर पेसा ५%थेट निधी योजना अंतर्गत साहित्य खरेदी करतांना ग्रामसभेत साहित्य खरेदीस मान्यता घेवून पंचायत समिती स्तरावरुन रोस्टर नुसार वर्तमानपत्राचे नाव घेऊन त्यात जाहीर निवीदा प्रसिध्द करुन त्यानुसार निविदा बोलावुन ग्रामपंचायत स्तरावर साहीत्य खरेदी करण्यात आलेले तसेच खरेदी करण्यात आलेल्या साहीत्याचे खर्चास ग्रामसभेची मंजुरी घेण्यात आलेली आहे.
(२) ग्रामसचिवाकडून नियमानुसार ग्रामसभा बोलविण्यात आलेली असुन ग्रामसभेत उपस्थितांना विश्वासात घेण्यात अलेले आहे. याबाबत ग्रामसभेच्या इतिवृत्तात नोंद घेण्यात आलेली आहे.
(३) होय. याबाबत संबंधित गट विकास अधिकारी यांनी ग्रामपंचायत स्तरावर प्रत्यक्ष भेट देवून चौकशी करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राजुरा (जि.चंद्रपूर) येथील कोळसा उत्खनन बंद करण्याबाबत

**(४७) ९३१५७ (०९-०८-२०१७). ॲड.संजय धोटे (राजूरा), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरा (जि.चंद्रपूर) येथील वेकोलि, बल्लारपूर, क्षेत्रातंर्गत येत असलेल्या सास्ती,धोपटाळा व गोवरी उपक्षेत्रात अनेक कोळसा खाणी सुरू आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कोळसा खाणीत ठोस उपाययोजने अभावी कोळसा उत्खननामुळे ग्रामस्थांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कोळसा खाणीमुळे प्रदूषण, रस्त्याची होणारी दयनीय अवस्था, मालमत्तेचे नुकसान, खालावलेली जलपातळी, आरोग्य यासारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू कोळसा उत्खनन बंद करण्याबाबत स्थानिक नागरिकांनी मागणी केली असून तसा ठराव ग्रामसभेने पारित केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून तद्नुसार उक्त कोळसा खाण त्वरीत बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२१-०९-२०१७) :** (१) मे. वेस्टर्न कोलफिल्ड लि. यांनी सास्ती व गोवरी उपविभागात कोळसा खाणी सुरू असल्याचे कळविले आहे. धोपटाळा उपक्षेत्र नसल्याचे देखिल नमूद केले आहे.

(२) याबाबत कोणतेही निवेदन प्राप्त नाही.

(३) मे. वेस्टर्न कोलफिल्ड लि. बल्लारपूर यांच्या अहवालानुसार CMR Act मधील नियमानुसार खाणकाम चालत असल्याचे कळवून खाणीमध्ये पर्यावरण व सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात येतात. तसेच पाण्याची पातळी CMPDIL कडून तपासण्यात येत असून, वार्षिक पर्जन्यमानाचे प्रमाणात भुजल पातळीचा कल असल्याचे मे. वेस्टर्न कोलफिल्ड लि. यांनी कळविले आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपूर यांच्या अहवालानुसार मागील पाच वर्षात आजाराच्या प्रमाणात घट किंवा वाढ झाल्याचे दिसून येत नाही व आजार प्रदुषणामुळे झाल्याचे निश्चित सांगता येत नाही.

(४) व (५) होय, ग्रामपंचायतीने दिलेल्या निवेदनाचे अनुषंगाने दिनांक १४/०६/२०१७ ला सभा आयोजित करण्यात आली. त्यात ग्रामसभेने घेतलेल्या ठरावातील व निवेदनातील मुद्यांवर चर्चा करून मे. वेस्टर्न कोलफिल्ड लि. बल्लारपूर च्या प्रशासनास सदर मुद्यावर १५ दिवसांचे आंत कार्यवाही करून अहवाल सादर करण्याचे निर्देश मे. वेस्टर्न कोलफिल्ड लि. बल्लारपूर क्षेत्र यांना उप विभागीय अधिकारी, राजूरा यांनी दिलेले आहे.

---

**विरूळ (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) येथील सावकाराने अधिकाऱ्यांच्या संगणमताने शेतकऱ्यांच्या जमीनी ताब्यात घेतल्याबाबत**

**(४८) ९३९१७ (०६-०९-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरूळ (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) येथील गट क्र. ८ मधील १ हेक्टर, ९७ आर ही जमीन श्री.पुंडलिक रामन्ना अवधुतकार यांच्या नावे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीन मालकाने मुलीच्या लग्नकार्यासाठी सदर जमीन घोटी (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) येथील सावकार श्री.महेंद्र मनोहर माडूरवार यांच्याकडे गहाण ठेवून रुपये चार लाख कर्ज घेतले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त व्यवहारात सावकार व सहाय्यक निबंधक, घाटंजी यांनी संगनमताने उक्त अशिक्षित शेतकऱ्याला फसवून सदर जमिनीचे गहाणपत्र न करता खरेदीपत्र केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर सावकाराकडे सावकारी करण्याचा परवाना नसताना अधिकाऱ्यांशी संगनमत करून अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून सदर सावकार व या प्रकरणातील संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच सदरची जमीन उक्त शेतकऱ्याला परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१६-१०-२०१७) :** (१) नाही.

(२) व (३) श्री.पुंडलिक रामन्ना अवधुतकार यांनी सदर जमीन श्री.श्रीनिवास शिवदास पडगीलवार यांना दिनांक ०२.०६.२०१२ रोजी दुय्यम निबंधक, घाटंजी यांचे दस्त क्र. ६९६/२०१२ अन्वये विक्री केल्याचे निदर्शनास येते. दि.२३.०६.२०१५ च्या ७/१२ नोंदी नुसार सदर जमीन श्री.श्रीनिवास शिवदास पडगीलवार यांचे नावे आहे.

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, घाटंजी यांच्या कडे प्राप्त तक्रार अर्जाच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणात चौकशी केली असता सदर जमीन मालकाने मुलीच्या लग्नकार्यासाठी सदर जमीन घोटी येथील सावकार श्री.माडुरवार यांच्याकडे गहाण ठेवल्याचे निदर्शनास आले नाही.

(४) नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### शासकीय मुद्रणालय, मुंबई येथील अधिकाऱ्यांना सेवा जेष्ठता देण्याबाबत

**(४९) ९४०५२ (१८-०८-२०१७). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय मुद्रणालय, मुंबई येथील जुळणी विभाग बंद झाल्यानंतर सदर विभागातील व्यवस्थापनाने सन १९८३ पासून जुळणी पदावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना लेखापट विभागातील प्रशिक्षणासाठी पाठविले, सन २००८ मध्ये नवीन लेखापट विभाग तयार केला व जुळणी पदावरील कर्मचाऱ्यांना समकक्ष वेतनश्रेणीत सामावून घेतले तसेच १०६ नवीन पदे निर्माण केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लेखापट विभागाने सन २००८ मध्ये जारी केलेल्या सेवाजेष्ठता सुचित श्री.गावडे व इतर यांच्यावर अन्याय झाला असून याबाबत त्यांनी वरीष्ठ अधिकारी, संचालनालय, शासकीय मुद्रणालय व लेखनसामुग्री विभाग यांचेकडे ३० मार्च, २२ मे, २२ ऑगस्ट, २७ ऑक्टोबर,२००९, १ फेब्रुवारी, २०१० रोजी व सन २०१३ मध्ये सचिव, प्रधान सचिव, उद्योग यांचेकडे विनंती अर्ज सादर केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तद्नंतर श्री.गावडे व अन्य कर्मचाऱ्यांनी दिनांक १९ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे सदर अन्यायाबाबत निवेदन केले असून सदर निवेदन मुख्यमंत्री कार्यालयाकडून उद्योग विभागाला पाठविण्यात आल्यानंतर उद्योग विभागाने सदर पत्र उद्योग संचालनालयास पाठवून या संदर्भातील अहवाल योग्य ती कार्यवाही करून अहवाल सादर करण्यास सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दोन वर्षापासून सदर अहवाल अद्याप अप्राप्त आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत चौकशी करून विलंब करणाऱ्या उद्योग संचालनालयातील अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली व श्री.गावडे यांना नियमाप्रमाणे सेवा जेष्ठता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२२-०९-२०१७) :** (१) होय.

छपाई तंत्रज्ञानामध्ये कालारुपानुसार झालेल्या बदलामुळे जुळणी विभाग कालबाहय झाला त्यामुळे बदलल्या तंत्रानुसार लेखपट हा विभाग १९८३ पासून नव्याने निर्माण करण्यात आला. मुद्रणालयात जसे-जसे संगणक प्राप्त झाले त्यानुसार व्यवस्थापनाने जे कर्मचारी लेखपट विभागात काम करण्यास इच्छूक आहेत, त्यांचे कडून अर्ज मागवून त्यांना लेखपट विभागात प्रशिक्षणासाठी पाठविले. त्यांना त्यांच्या इच्छेनुसार लेखपट विभागात सदर काम देण्यात आले. सदर कर्मचारी लेखपट विभागात प्रशिक्षण घेऊन तेथील दैनंदिन काम करू लागले. त्यानंतर सन २००७ साली मुद्रणालयाचा पदांचा सुधारित आकृतीबंध मंजूर झाला. सदर आकृतीबंधात लेखपट विभागासाठी १०४ पदे मंजुर करण्यात आली. त्यावर समकक्ष वेतनश्रेणीतील प्रशिक्षित व अनुभवी कर्मचाऱ्यांना सामावून घेण्यात आले.

(२) होय.

(३) होय.

श्री.वि. मु. गावडे यांनी सन २०१३ मध्ये व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांना लिहिलेले व या संचालनालयास पृष्ठांकित केलेले दिनांक ३१.१०.२०१३ रोजी विनंती अर्ज सादर केला होता. त्यास अनुसरुन या संचालनालयाने श्री. गावडे यांच्या ज्येष्ठतासूचीचे प्रकरण तात्काळ निकाली काढावे असे व्यवस्थापकास निर्देश दिले. तद्नुषंगाने, व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांनी लेखपट विभागाची दिनांक ०१.०१.२०१६ रोजी तात्पुरती सेवा ज्येष्ठतासूची प्रसिध्द केली असून लवकरच अंतिम सेवाज्येष्ठता सूची प्रसिध्द करण्याची कार्यवाही संचालनालयाच्या स्तरावरुन करण्यात येत आहे.

(४) व (५) हे अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणी विलंब झाला आहे ही वस्तुस्थिती आहे. तथापि, सदर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत लेखपट विभागातील दिनांक ०१.०१.२०१६ रोजीची सेवाज्येष्ठतासूची मुंबई मुद्रणालयाकडून तात्काळ अंतिम करुन कर्मचाऱ्यांची बाजू तपासून घेण्याबाबतची कार्यवाही संचालनालयाच्या स्तरावरुन करण्यात आलेली आहे. अंतिम ज्येष्ठतासूची संचालनालयाच्या स्तरावरुन प्रसिध्द करण्यात येत आहे. या प्रकरणी उशीर झाल्याने संबंधित कर्मचाऱ्यांना समज देण्यात आलेली आहे.

---

**पुणे येथील जिल्हा रेशीम कार्यालयातील वरिष्ठ तांत्रिक सहायक आणि क्षेत्र सहायकांनी केलेल्या गैरप्रकाराबाबत**

**(५०) ९४१८२ (०९-०८-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील जिल्हा रेशीम कार्यालयात अनेक वर्षापासून कार्यरत असलेल्या वरिष्ठ तांत्रिक सहायक व क्षेत्र सहायक यांनी शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक केल्याची तक्रार संचालक रेशीम संचालनालय, नागपूर यांच्याकडे शेतकऱ्यांनी केल्याचे माहे जून,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संचालक रेशीम संचालनालय, नागपूर यांनी दिनांक २२ एप्रिल,२०१६ रोजी सहायक संचालक प्रादेशिक रेशीम कार्यालय, पुणे यांना चौकशी करून तीन दिवसात अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी अद्यापही चौकशी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची उच्च स्तरीय अधिकाऱ्यामार्फत चौकशी करून संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (१२-१०-२०१७) :** (१) जिल्हा रेशीम कार्यालय, पुणे अंतर्गत तुती लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांनी दि.२३/०३/२०१६ व दि.२८/०३/२०१६ च्या पत्रान्वये त्यांना कर्मचाऱ्यांच्या होत असलेल्या त्रासाबाबत रेशीम संचालनालयास तक्रार केली आहे. मात्र माहे जुन, २०१७ व त्या दरम्यान तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) होय. सहायक संचालक, प्रादेशिक रेशीम कार्यालय, पूणे यांना संचालनालयाचे पत्र दिनांक २२/०४/२०१६ अन्वये सात दिवसात चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत कळविले होते. तसेच दिनांक १४/०६/२०१६, दिनांक १७/०९/२०१६, दिनांक ९/०१/२०१७ व दिनांक ३०/०१/२०१७ या स्मरणपत्रान्वये चौकशी अहवाल सादर करण्याबाबत कळविले होते.

(३) होय. सहायक संचालक, प्रादेशिक रेशीम कार्यालय पूणे यांनी चौकशी अहवाल सादर केलेला नाही.

(४) व (५) सहायक संचालक (रेशीम), पुणे यांनी शेतकऱ्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित कर्मचाऱ्यांची चौकशी न केल्याकारणाने त्यांना दिनांक ०५/०९/२०१७ रोजी कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे. दरम्यान वरीष्ठ तांत्रिक सहायक व इतर कर्मचाऱ्याविरूध्द तक्रारीची त्वरेने चौकशी करण्याबाबत संचालक (रेशीम) यांना कळविण्यात आले आहे.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.